आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री ८.३० वाजता
०२ मे २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- किनारपट्टीवरची राज्यं आणि बंदरांची शहरं विकसित भारताच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विश्वास, केरळात खोल पाण्यातल्या आंतरराष्ट्रीय बहुउपयोगी बंदराचं केलं लोकार्पण

- वेव्हज परिषदेत वेव्हज बाजारानं पहिल्या दीड दिवसात केला २५४ कोटी रुपयांचा व्यवसाय

- महाराष्ट्रात उत्कृष्ट दर्जाच्या चित्रीकरणासाठी २ अत्याधुनिक स्टुडियो उभारण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा / निफ्टी वेव्हज् इंडेक्सचं उद्घाटन

- ऊर्जा क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्यासाठी भारत आणि डेन्मार्क यांच्यात नव्यानं सामंजस्य करार

**आणि**

- कथित मनी लाँड्रिगप्रकरणी दिल्लीच्या रोऊज एव्हेन्यू न्यायालयाकडून काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांना कारणे दाखवा नोटीस जारी

**<><><><><><>**

भारताच्या किनारपट्टीवरची राज्यं आणि बंदरांची शहरं विकसित भारताच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. केरळात तिरुवअनंतपुरम मध्ये विळींजम इथं खोल पाण्यातल्या आंतरराष्ट्रीय बहुउपयोगी बंदराचं उद्घाटन आणि लोकार्पण आज मोदी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. आतापर्यंत भारतातली ७५ टक्के  समुद्र मार्गानं होणारी आयात ही देशाबाहेरच्या बंदरांवर होत होती. ही सर्व प्रक्रिया अत्यंत खर्चिक होती. आता या विळिंजम बंदरामुळे हा खर्च वाचणार असून त्याचा उपयोग

केरळवासियांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्याकरता होईल, असंही ते म्हणाले.

**होल्ड.. बाईट - नरेंद्र मोदी**

विळींजम इथं ८ हजार ८०० कोटी रुपये खर्चून उभारलेलं हे बंदर देशातलं पहिलं अर्धस्वयंचलित, तसंच खोल पाण्यातलं, कंटेनर वाहतूक करणारं बंदर ठरणार आहे. समारंभाच्या आधी प्रधानमंत्र्यांनी बंदर सुविधांना भेट दिली आणि कामकाजाचा आढावा घेतला. त्यानंतर, अमरावती इथं त्यांच्या हस्ते ५८ हजार कोटी रुपयांच्या विविध विकास कामांची पायाभरणी झाली. भारतानं गेल्या १० वर्षांत भौतिक, सामाजिक तसंच डिजिटल प्रगतीवर लक्ष केंद्रित केलं असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. सरकार शेतकऱ्यांच्या विकासासाठी कटिबद्ध असून गेल्या दहा वर्षात बियाणं आणि खतासाठी १२ लाख कोटी खर्च केल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

वेव्हज् परिषदेत वेव्हज् बाजारानं पहिल्या दीड दिवसात चित्रपट, संगीत, ॲनिमेशन, व्हीएफएक्स आदी क्षेत्रात २५४ कोटी रुपयांचा व्यवसाय केला. पुढच्या दोन दिवसात यात आणखी भर पडेल, असं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं. वेव्हज् बाजारमधल्या खिडकी गाँव या प्रकल्पानं एशियन सिनेमा फंडशी व्हीएफएक्स करार केला. या प्रकल्पाचं मूल्य दोन कोटी रुपये आहे. जागतिक प्रेक्षकांसाठी कंटेट निर्मिती करण्याच्या उद्देशानं सध्या ओएमएल आणि गॅझप्रॉम मीडिया यांच्यात करार होणार आहे. त्याचप्रमाणे दिग्दर्शक मकिको इबाबा यांनी शिन चान इंडिया इयरची आजच्या वेव्हज् परिषदेत घोषणा केली.

**<><><><><><>**

वेव्हज अर्थात जागतिक दृकश्राव्य शिखर परिषदेत दुसऱ्या दिवशी आज जागतिक माध्यम संवाद कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. तंत्रज्ञान आणि परंपरा हातात हात घालून जायला हव्यात, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर या सत्राचं उद्घाटन करताना म्हणाले. तंत्रज्ञानामुळे तरुण पिढीचा अनुभव समृद्ध होतो, विकसित भारताच्या निर्मितीसाठी नवोन्मेष आवश्यक आहे, असं त्यांनी सांगितलं.

संस्कृती सर्जनशीलतेला प्रेरित करते असं माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले. संस्कृतीच्या वैविध्याला आपण पाठिंबा द्यायला हवा, असंही ते म्हणाले. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यावेळी उपस्थित होते.

या सत्रात ७७ देशांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. माध्यमांमधून पसरणाऱ्या चुकीच्या माहितीला आळा घालायला हवा यावर सर्व प्रतिनिधींचं एकमत झालं.

**भारत-**अमेरिका सर्जनशीलता परिसंस्थेला चालना देण्यासाठी वेव्हज् परिषदेत सत्र आयोजित करण्यात आलं. अमेरिकेचे काऊन्सलर माईक हँकी यांनी या सत्राचं उद्घाटन केलं आणि उपस्थितांना संबोधित केलं.

**भारतानं** आपलं तत्त्वज्ञान, ज्ञान आणि शिकवणीच्या आधारे जगाच्या ज्ञानात भर टाकली, असं उद्योजक **निता अंबानी** म्हणाल्या. त्या वेव्हज् परिषदेत एका चर्चासत्राला संबोधित करत होत्या. भाषा, साहित्य, संगीत आणि वैद्यकीय ज्ञान अशा सर्वच क्षेत्रात भारतानं जगाला भरीव योगदान दिलं आहे, असं त्या म्हणाल्या.

**वेव्हज्** परिषदेत आज रेडिओ रिइमॅजीन्ड या विषयावर चर्चासत्र झालं. नभोवाणी हे खरोर लोककल्याणासाठी काम करणारं माध्यम असून भारत ही नभोवाणीची सर्वात मोठी बाजारपेठ आहे, असं प्रसारभारतीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी शशी वेम्पट्टी यावेळी म्हणाले. समाजाच्या विविध स्तरातले श्रोते नभोवाणीला लाभले आहेत, असंही ते म्हणाले.

**<><><><><><>**

वेव्हज् परिषदेत जगभरातले आशय निर्माते, विविध माध्यम समूहांचे प्रमुख कार्यकारी अधिकारी सहभागी होत आहेत. या परिषदेतून निर्माण होणाऱ्या संधीविषयी क्राफ्टन इंडियाचे वरिष्ठ अधिकारी सौरभ शहा म्हणाले…

**होल्ड… बाईट - सौरभ शहा**

**<><><><><><>**

चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी महाराष्ट्रात दोन अत्याधुनिक स्टुडिओ उभारले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केली. मुंबईत सुरू असलेल्या वेव्हज् परिषदेत भारत पेव्हेलियनला मुख्यमंत्र्यांनी आज भेट दिली, त्यावेळी त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. या दोन स्टुडिओच्या उभारणीसाठी प्राईम फोकस आणि गोदरेजसोबत सामंजस्य करार केले आहेत. या स्टुडिओंमधे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चित्रीकरण करता येईल, असं त्यानी सांगितलं. गोदरेजच्या सहाय्यानं पनवेलमधे दोन हजार एकर जागेवर चित्रनगरी उभारली जाणार असून यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

आता चित्रनगरी उभारण्यासाठी जागेची नाही, तर तंत्रज्ञानाची गरज आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले….

**होल्ड बाईट मुख्यमंत्री (१.५० ते २.१४)**

मुख्यमंत्र्यांनी आज राष्ट्रीय शेअर बाजाराच्या Nifty Waves Index चं अनावरण केलं. माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातल्या ४३ कंपन्याच्या समभागांचा सहभाग या निर्देशांकात आहे. राज्य सरकारनं आज दोन विदेश विद्यापीठांशी सामंजस्य करार केले. नवी मुंबई इथं एज्यु सिटी तयार करणार असून, यात जगातल्या सर्वोत्तम विद्यापीठांपैकी दहा ते बारा विद्यापीठं आणली जाणार आहेत,

अशाच प्रकारच्या दोन विद्यापीठांशी आज करार झाले. या अंतर्गत दोन्ही विद्यापीठं प्रत्येकी पंधराशे कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ऊर्जा  क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्यासाठी भारत आणि डेन्मार्क यांनी आज नव्यानं सामंजस्य करार केला. २०७० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनाचं उद्दिष्ट गाठण्याच्या भारताच्या महत्वाकांक्षी लक्ष्याला या करारामुळे पाठबळ मिळणार आहे. दोन्ही देशांमधे तंत्रज्ञान सहयोग, विशेषतः स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जा उपायांची देवाणघेवाण वाढवणं हा या कराराचा उद्देश आहे.

**<><><><><>**

नॅशनल हेरॉल्ड कथित मनी लाँड्रिगप्रकरणी दिल्लीच्या रोऊज एव्हेन्यू न्यायालयानं काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांना आज नोटीस जारी केली. सोनिया गांधी आणि इतरांविरुद्ध मनी लाँड्रिग प्रतिबंधक कायद्याखाली ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयानं दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल का घेऊ नये, याची कारणं स्पष्ट करायला न्यायालयानं सांगितलं आहे.

**//<><><><><><>//**